सकाळ

# विद्यापीठ परीक्षा सोमवारपासून



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्ट, लॉ व शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षांना सोमवारपासून (ता. २४) सुरुवात होत आहे. अन्य अभ्यासक्रमांचे वेळापत्रक सोमवारपासून टप्प्याटप्प्याने जाहीर केले जाणार आहे. सर्व परीक्षा ऑनलाईन होणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली. परीक्षा विभागातर्फे ६६४ पैकी ३६५ परीक्षा घेतल्या जाणार आहेत. पदवीच्या पहिल्या वर्षासह डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेसच्या परीक्षा महाविद्यालय व अधिविभाग स्तरावर घेतल्या जातील. ज्या विद्यार्थ्यांचे मोबाईल व ई-मेल आयडी अपडेट करायचे असतील, त्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाऊन करावेत, अन्यथा याआधीच्या मोबाईल व ई-मेल आयडीवर त्यांच्या परीक्षा होणार आहेत.

सकाळ

# 'महाविद्यालये सुरू करण्यास अनुकूल'



उदय सामंत

मुंबई, ता. २१ : महाविद्यालये सुरू करण्यास उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी अनुकूलता दर्शवली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे हा प्रस्ताव पाठवण्यात आला असून त्यांच्या परवानगीनंतर महाविद्यालये देखील सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. महाविद्यालये देखील सोमवारी सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

22 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उझी माशीचा प्रादुर्भाव होणार कमी

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : उझी माशीच्या प्रादुर्भावामुळे होणारे रेशीम कीटक संगोपनगृहाचे नुकसान आता टळणार आहे. माशीच्या कोषावर उपजीविका करणारा परोपजीवी कीटक निझोलेक्स थायमस जैविक पद्धतीत वापरून माशीला पायबंद बसतो, हे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी श्रद्धा जगन्नाथ बेळगुंपे हिने संशोधन केले असून, ते रेशीम कोष उत्पादकांसाठी महत्त्वाचे आहे.



**श्रद्धा बेळगुंपे**

तिने 'बायोकंट्रोल पोटेन्शियल ऑफ उजिफ्लाय एक्झॉरिस्टा बॉम्बायसिस लुईस ऑन एफसी १ अँन्ड एफसी २ ब्रीड ऑफ बॉम्बीक्स मोरी लीन फ्रॉम वेस्टर्न महाराष्ट्र' शोध प्रबंध सादर करून त्यांनी पीएच.डी. मिळवली. प्रा. डॉ. ए. डी. जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले.

रेशीम कीटक संगोपनात कोष उत्पादक शेतकऱ्यांसाठी उझी माशी डोकेदुखी ठरते. पावसाळा व हिवाळ्यात तिचा प्रादुर्भाव जास्त असतो. बदलता पाऊस, तापमान आणि आर्द्रतेनुसार तिची अंडी देण्याची क्षमता बदलते. उन्हाळ्यात ३२ ते ४२ अंश सेल्सिअस तापमानामुळे तिचा प्रादुर्भाव कमी असतो.

## संशोधन काय सांगते

माशीच्या कोषावर उपजीविका करणारे निझोलेक्स थायमस परोपजीवी कीटक जैविक पद्धतीत वापरला जातो. ते कीटक संगोपन गृहात रेशीम किटकांनी चौथी कात टाकल्यानंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी सोडावेत. शंभर अंडी पुंजासाठी परोपजीवी किटकाचे दोन पाऊच लागतात. रेशीम कीटक कोषावर गेल्यानंतर निझोलेक्स थायमस या परोपजीवी किटकांची पिशवी चंद्रिकेजवळ ठेवावेत. कोष काढणीनंतर परोपजीवी किटकांची पिशवी खताच्या खड्ड्याजवळ ठेवावी. जैविक पद्धतीत कीड नियंत्रण केल्याने पर्यावरणाला हानी पोहचत नाही.

प्रौढ उझी माशी घरमाशीपेक्षा मोठी असते. मादी अंडी ग्रंथीच्या साह्याने रेशीम कीटकाच्या पाठीवर चिकटते. मादी नऊ दिवसात २०० ते ३०० अंडी घालते. दोन ते तीन दिवसांच्या अंडी उबवणीनंतर अळी बाहेर पडते. अळ्या हूकच्या साह्याने रेशीम अळीच्या त्वचेवर छिद्र करून आत प्रवेश करतात. तिथे काळ्या रंगाचा डाग पडतो. शरीरातील स्निग्ध पदार्थ खाऊन उपजीविका करून वाढतात.

तरुण भारत

# आंतरविभागीय हँण्डबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजचा संघ विजेता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय हँण्डबॉल स्पर्धेचे विजेतपद न्यू कॉलेजने पटकावले. न्यू कॉलेजमध्येचे स्पर्धा झाली. वेजेत्या संघामध्ये साहिल करले, अभिजीत्त लोहार, रजत पाटील, श्रीधर पाटील, गणेश मछले, सुशांत साळवी, अमन शेख, ओंकार रुमाले, ओंकार आमते, विनायक पाटील, सुभाष चौगले, अवधूत पाटील, प्रथमेश पाटील, तेजस शिंगे, संकेत लाड, रुद्र जाधव यांचा समावेश होता. संघाला प्रिन्स शिवाजी मराठा बार्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांचे प्रोत्साहन तर क्रीडा विभाग प्रमुख अमर सासने यांचे मार्गदर्शन मिळाले.